केंद्र शासनाचा महिती अधिकार-2005

कलम१९(1) अन्वये प्रथम अपील

प्रति,
अपिलीय अधिकारी,
सार्वजनिक, बांधकाम विभाग
मिरा भाईदर महानगर पालिका

अर्जदार :प्रमोद सामंत
ए/006, रिजन्सी एनक्लेव्ह, पूनम सागर कॉम्प्लेक्स
मिरा रोड, (पुर्व).

माहिती अधिकारी : नितीन मुकणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईदर महानगरपालिका

माहिती अधिकार अर्जाचा दिनांक :२६ फेब्रुवारी २०१८

अपिलाचे प्रयोजन : महिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडून अद्याप आवश्यक माहित उपलब्ध झाली नाही.

माहितीचा विषय : महापालिकेच्या क्षेत्रात सभागृहबांधणे करिता आपल्या विभागाने केलेल्या खर्चाच्या महितीबाबत.

माहितीचा तपशिल 1) महापालिकेच्या क्षेत्रात सभागृहबांधणे करिता आपल्या विभागाने केलेल्या खर्चासाठी सन 2014 पासून 2018 पर्यन्त मा. महासभा, स्थायी समिति सभा यांचे झालेले ठरवाची प्रत, आयुक्तांकडून देण्यात आलेल्या मंजुरींच्या प्रती, तसेच या सभागृह च्या बांधकामाची शहारवसिया कडून आलेल्या शिफारसी/मागणी पत्राच्या प्रती देण्यात याव्या.

2.महापालिकेच्या क्षेत्रात सभागृहबांधणे करिता आपल्या विभागा कडून ठेकेदारस देण्यात आलेले कार्यादेश, ठेकेदारस अदा करण्यात आलेली देयके, वेळोवेळी बनविण्यात आलेली अंदाजपत्रके, सुधारित अंदाजपत्रके घेण्यात आलेल्या आवश्यक तांत्रिक मंजुऱ्या, आर्थिक प्रशासकीय मंजुऱ्या यांच्या प्रती देण्यात याव्या.

3.काम पूर्णत्वाचा दाखला, थर्ड पार्टी ऑडिटरयांचा अहवाल तसेच सभागृह बांधकामा साठी सन 2014 ते सन 2018 पर्यन्त प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा होणाऱ्या खर्चाच एकूण तपशीलाची प्रत देण्यात यावी.

माहिती : व्यक्तिशा मिळावी
ठिकाण : मीरा रोड
दिनांक : 24/04/2018

मि. भा. म. न. पा.
सा. बां. विभाग
आ. क्र. ४४५
दिनांक 24/4/18

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २५१४५९८५ फॅक्स : २८१९७६३६

## // बांधकाम विभाग //

जा.क्र. मनपा/साबां/मअ/७७५ /२०१८-१९
दि. १५/०६/२०१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या समोरील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) अन्वये दाखल झालेले अपिल.**

प्रति,

| | | |
|---|---|---|
| १) अपिलकर्ता | :- | **श्री. प्रमोद जयराम सामंत**<br>ए-००६, रिजन्सी एन्क्लेव्ह,<br>पुनमसागर कॉम्पलेक्स, मिरारोड (पूर्व) |
| २) जन माहिती अधिकारी | :- | **नितिन मुकणे, उपअभियंता, बांधकाम विभाग** |
| मुळ अर्जाची तारीख | :- | ०१/०३/२०१८ |
| प्रथम अपिलाची तारीख | :- | ०९/०५/२०१८ |
| सुनावणी दिनांक | :- | १५/०६/२०१८ दु. ३.२० वा. |

## // पुर्वपिठिका //

श्री. प्रमोद जयराम सामंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सादर केलेल्या अर्जाच्या माहिती बाबत अपिल दाखल केलेले आहे. अपिलकर्त्यांने माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे दि.०१/०३/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत बांधकाम विभागामार्फत सन २०१४ पासून सभागृह बांधणे कामाबाबतचे मा. महासभा मंजूरी, मा. स्थायी समिती मंजूरी, मा. आयुक्त मंजूरी, ठेकेदारास देण्यात आलेले कार्यादेश, अदा केलेले देयक, अंदाजपत्रके, तांत्रिक मंजूरी, त्रयस्थ लेखा परीक्षण अहवाल इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी मनपा/साबां/मा.अ./२२२/२०१७-१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये माहिती तयार केलेली आहे. माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.मनपा/साबां/१३१३२/२०१७-१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये माहिती शुल्काचा भरणा करण्यास कळविले आहे. मात्र अर्जदाराने माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केला नाही व माहिती प्राप्त करुन घेतली नाही. तद्नंतर श्री. प्रमोद जयराम सामंत यांनी माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून दि.०९/०५/२०१८ रोजी अपिल दाखल केलेले आहे.

## // न्यायनिर्णय //

अर्जदाराने माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत बांधकाम विभागामार्फत सन २०१४ पासून सभागृह बांधणे कामाबाबतचे मा. महासभा मंजूरी, मा. स्थायी समिती मंजूरी,

मा. आयुक्त मंजूरी, ठेकेदारास देण्यात आलेले कार्यादेश, अदा केलेले देयक, अंदाजपत्रके, तांत्रि त्रयस्थ लेखा परीक्षण अहवाल इ. माहिती मागितलेली आहे. माहिती अधिकारी यांनी पत्र मनपा/साबां/मा.अ./२२२/२०१७-१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये माहिती तयार केलेली आहे. माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.मनपा/साबां/१३१३२/२०१७-१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये माहिती शुल्काचा भरणा करण्यास कळविले आहे. मात्र अर्जदाराने माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केला नाही व माहिती प्राप्त करुन घेतली नाही. तद्नंतर श्री. प्रमोद जयराम सामंत यांनी माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून दि.०९/०५/२०१८ रोजी अपिल दाखल केलेले आहे. सदरील अपिलाची सुनावणी दि.१५/०६/२०१८ रोजी ठेवण्यात आली.

सुनावणी दरम्यान माहितीचे अवलोकन करून सदरील अपिलावर खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

// निर्णय //

अपिलकर्त्यास माहिती अधिकारी यांनी इकडील मनपा/साबां/मा.अ./२२२/२०१७-१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये तयार केलेली माहिती, अपिलकर्त्याने माहिती छायांकीत शुल्काचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

सदर अपिल अर्ज निकाली काढण्यांत येत आहे.

(दिपक खांबित )
**अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

<u>स्थळ</u> :- कार्यकारी अभियंता कार्यालय
मिरा-भाईंदर महानगरपालिका

<u>प्रत</u> :-

१. **श्री. प्रमोद जयराम सामंत** ए-००६, रिजन्सी एन्क्लेव्ह, पुनमसागर कॉम्पलेक्स, मिरारोड (पूर्व)

२. **नितिन मुकणे, जन माहिती अधिकारी तथा उप-अभियंता**, बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-10/NM/18-19/A-1/Adhesh-445

भारतीय डाक
India Post

EM114921262IN IVR:69771149212
SP BHAYANDER WEST S.O <401101
Counter No:6,18/06/2018,12:04
To:PRAMOD J SAMANT,MIRA RD.
PIN:401107, Mira Road S.O
From:APILIY ADHIKARI,BHYN
Wt:10gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 1800 266 6868>

Samrat - samratent@gmail.com